# जाहिर निवेदन

अधिक्षक अभियंता, महावितरण, मंडळ कार्यालय, नांदेड यांच्या आस्थापनेवर सन २०२१-२०२२ करीता NCTVT अंतर्गत वीजतंत्री/तारतंत्री (Designated trade) या स्वतंत्र व्यवसायासाठी आय.टि.आय उत्तीर्ण उमेदवारांकडुन एक वर्ष कालावधी करीता शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थी वीजतंत्री ६० व तारतंत्री ६१ अशी एकुण १२१ पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ईच्छुक उमेदवारांनी दि.१५.०६.२०२१ (००.००) ते दि.२२.०६.२०२१ (२४.००) www.apprenticeshipindia.org.in या संकेतस्थळावर **आस्थापना** कोड **E02172700009** वर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. दि.२२.०६.२०२१ नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. निवड ही आय.टि.आय. एकुण गुणाच्या टक्केवारी (मेरीट) नुसार खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन करण्यात येईल.

१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ यांचे माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री/तारतंत्री या स्वतंत्र व्यवसायात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे २) ऑनलाईन अर्ज सादर करताना – SSC गुणपत्रीका व प्रमाणपत्र, आयटिआय गुणपत्रिका (चार सेमिस्टर/वार्षिक) व आयटीआय उत्तीर्ण प्रमाणपत्र, जातप्रमाणपत्र (मागास प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना आवश्यक), रहिवाशी प्रमाणपत्र, उमेदवाराची सही, फोटो, जन्म तारिख, जातप्रवर्ग ही माहिती अचुक भरण्यात यावी तसेच इतर आवश्यक मुळ प्रमाणपत्र योग्य रितीने सुस्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन उमेदवारांनी स्वत:च्या प्रोफाईलवर अपलोड करावे, सोबत रहिवाशी प्रमाणपत्र, आधारकार्ड सादर करणे आवश्यक आहे. अपुरे अर्ज किंवा अस्पष्ट कागदपत्रे ऑनलाईन अपलोड केल्यास अश्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही व या बाबत कसल्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. ३) वयोमर्यादा १८ ते २७ वर्ष, मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथीलक्षम. ४) सदर भरती करीता नांदेड जिल्हयातील रहिवासी असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल ५) शिकाऊ उमेदवार पोर्टलवर रजिस्ट्रेशन करणे व ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे व इतर मार्गाने सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. ६) विद्यावेतन-नियमाप्रमाणे. ७) या कार्यालयामार्फत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना त्यांनी ऑनलाईन अर्जात सादर केलेल्या ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांकावर पुढील कार्यवाही बाबत कळविण्यात येईल. सुरु असलेले ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक ऑनलाईन अर्जात सादर करणे हि सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. ८) निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना नांदेड मंडळ अंतर्गत नांदेड शहर, नांदेड ग्रामीण, भोकर व देगलूर या विभागामध्ये वाटप करण्यात येईल. मुळ कागदपत्रे तपासणी वेळी काही तफावत अथवा माहिती चुकीची आढळल्यास उमेदवाराची निवड कुठल्याही टप्प्यावर रदद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

टिप- भरती प्रक्रियेमध्ये आवश्यकता भासल्यास कोणताही बदल करण्याचे किंवा संपुर्ण जाहिरात रदद करण्याचे, नमुद पदे कमी-जास्त करण्याचे तसेच भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

**PRO No.- 80**
**dt.11.06.2021**

**अधिक्षक अभियंता, महावितरण, मंडळ कार्यालय नांदेड.**